	प्राथमिक आरोग्य केंद्र खारेपाटण	
	ई.मेल :- phckharepatansindhu@gmail.com	
	जाक्र/आवि/आस्था/प्राआकेंखा/473/2026 दिनांक-28/10/2026	

दरपत्रक मागणी

प्राथमिक आरोग्य केंद्र खारेपाटण ता.कणकवली करिता सन 2026 - 2027 या आर्थिक वर्षात खालिल प्रमाणे Booklet माहीती पुस्तीका छपाई करणेचे आहे. करीता इच्छुक दरपत्रक धारकांकडून खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

Sr. No.	Particulars	आवश्यक नग संख्या	पुरवठाधारकाने सादर करावयाचे दर (प्रती पुस्तक)
1	सीपीएचसी मॉडयुल 2 माहीती पुस्तक (पृष्ठे 152, पेपर 70 जीएसएम मॅपलिथो, पेपर साईज A4) - Staple Biding Book	50	
2	सीपीएचसी Flip Chart माहीती पुस्तक (पृष्ठे 120, पेपर 70 जीएसएम मॅपलिथो, पेपर साईज A4) - Staple Biding Book	50	

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 7 दिवसाच्या मुदतीत रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यत विहित नमून्यात परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

दरपत्रकाच्या अटी व शर्ती

1) दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रका सोबत शासकिय संस्थेमार्फत दिलेला नोंदणी दाखला / जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच नोंदणीपत्रकावर नमूद मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत जोडावयाचे आहेत. दरपत्रक सोबत सादर करावयाच्या बंद लखोटयांत सदरची नोंदणी प्रमाणपत्र व मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा सदरची दरपत्रक नामंजूर करणेत येतील.
2) नमुद दर हे सर्व प्रकारच्या करासहित तसेच या कार्यालयास पोंच करावयाच्या वाहतूक खर्चासहित सादर करावेत. त्या व्यतिरिक्त अन्य कोणतेही दर/चार्जिस अदा केले जाणार नाहीत.
3) ज्या दरपत्रक धारकांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी आदेश दिलेपासून दरपत्रकात नमूद दरानुसार पुरवठा दिलेल्या कालावधीत करणे बंधनकारक राहिल. तसेच वस्तुच्या नग संख्येमध्ये आवश्यकतेप्रमाणे अनुदानाच्या उपलब्धते नुसार कमी अधिक बदल होवु शकतो.
4) मंजूर दरपत्रकानुसार साहित्य पोंच झालेवर सर्व करांसहित देयक त्वरीत कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. संबधीत मक्तेदाराच्या बॅंकखातेवर देयकाची रक्कम जमा करणेत येईल.
5) विहित मुदतीत दरपत्रके प्राप्त न झालेस अथवा पुरवठा आदेश दिलेपासून विहित मुदतीत पुरवठा न झालेस सदर पत्रक नाकारण्याचे अधिकार खाली स्वाक्षरी करणार यांचे रहातील. पोस्टाने पाठविलेल दरपत्रक उशीराने प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

वैद्यकिय अधिकारी गट - अ
प्राथमिक आरोग्य केंद्र खारेपाटण
ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग

दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण

1)www.nrhm.maharashtra.gov.in
2)www.arogya.maharashtra.gov.in
3)प्राथमिक आरोग्य केंद्र खारेपाटण नोटीस बोर्ड

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner